L. A. BILL No. LVI OF 2026.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

१. या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (चौथी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूचीची सुधारणा.

२. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एकमध्ये,— १९५८ चा ६०.

(एक) अनुच्छेद ३४ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल :—

“**३४अ. हमी-**

(अ) वित्तीय किंवा बँक हमी,-

(एक) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली हमीची रक्कम पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर,	किमान पाचशे रुपयांच्या अधीन राहून, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के;
(दोन) इतर कोणत्याही बाबतीत,	कमाल वीस लाख रुपयांच्या अधीन राहून,अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के;
(तीन) जेथे सार्वजनिक बांधकामांच्या किंवा सार्वजनिक खरेदीच्या, शासकीय महामंडळाच्या, स्थानिक प्राधिकरणाच्या, किंवा सांविधिक संस्थेच्या नावे हमी दिलेली असेल त्या बाबतीत,	पाचशे रुपये;
(चार) हमी दिलेल्या रकमेमध्ये वाढ न करता, विद्यमान वित्तीय किंवा बँक हमीचे नुतनीकरण किंवा मुदतवाढ,	कमाल पंचवीस हजार रुपयांच्या अधीन राहून, विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.२५ टक्के.
(ख) हमीपत्र	पाचशे रुपये.”;
(खंड (अ) मध्ये नमूद केलेले संलेख वगळून).	

(दोन) अनुच्छेद ३७ मध्ये, स्तंभ (१) मधील, “हमीपत्र (लेटर ऑफ गॅरंटी).—कबुलायत (क्रमांक ५) पहा” हा मजकूर वगळण्यात येईल.

उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८चा ६०) याच्या कलम ३ मध्ये अशी तरतूद आहे की, अधिनियमास जोडलेल्या अनुसूची -एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखांवर, उक्त अनुसूचीमध्ये दर्शविलेली मुद्रांक शुल्काची रक्कम आकारणीयोग्य असेल.

२. वाणिज्यिक व्यवहार, पायाभूत प्रकल्प, शासकीय करार, खरेदी प्रक्रिया व आर्थिक कार्ये यांमध्ये मोठ्या प्रमाणात बँक हमीचे व वित्तीय हमीचे संलेख वापरले जातात. सध्या, हमीचे असे संलेख, मुद्रांक शुल्क आकारण्याकरिता उक्त अनुसूचीमध्ये संलेखांचे वेगळे प्रवर्ग म्हणून विनिर्दिष्ट केलेले नाहीत. अशा संलेखांवर, जे प्रतिभूती बंधपत्रांशी संबंधित आहेत असे, उक्त अनुसूची- एकच्या अनुच्छेद ५४ अन्वये विनिर्दिष्ट केलेले मुद्रांक शुल्क आकारले जाते.

अशा संलेखांच्या नूतनीकरणाच्या किंवा मुदतवाढीच्या बाबतीत देखील हमीच्या पहिल्या संलेखासाठी आकारणीयोग्य असलेली मुद्रांक शुल्का इतकीच रक्कम, आकारली जाते. परिणामी, जरी हमीची रक्कम तीच राहत असली तरी देखील, हमीच्या संलेखांचे नूतनीकरण करण्याच्या किंवा मुदतवाढीच्या बाबतीत, पुन्हा मुद्रांक शुल्क आकारण्यात येते.

३. वाणिज्यिक व आर्थिक कार्यांमधील वित्तीय व बँक हमीच्या संलेखांचा वाढता वापर व त्यांचे महत्त्व विचारात घेता, वित्तीय किंवा बँक हमीच्या बाबतीत मुद्रांक शुल्क आकारण्याकरिता एक स्वतंत्र अनुच्छेदाची तरतूद करणे आणि अशा संलेखांच्या वेगवेगळ्या प्रवर्गांसाठी मुद्रांक शुल्काच्या वेगवेगळ्या दरांची तरतूद करणे आवश्यक आहे असे शासनास वाटते. यामुळे, शासनाच्या महसुलात देखील वाढ होईल. तसेच, जर त्याद्वारे हमी दिलेली रक्कम, पहिल्या संलेखामध्ये नमूद केल्याप्रमाणे तीच राहत असेल तर, अशा संलेखांच्या नूतनीकरणाच्या किंवा मुदतवाढीच्या बाबतीत, मुद्रांक शुल्काची आणखी कमी रक्कम आकारण्याची तरतूद करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे. म्हणून, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची- एकमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ६ जुलै, २०२६.

चंद्रशेखर बावनकुळे,
महसूल मंत्री.

वित्तीय ज्ञापन

या विधेयकामध्ये, वित्तीय किंवा बँक हमी संलेखांवर, अनुच्छेद ३४अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने मुद्रांक शुल्क आकारण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) यास जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये नवीन अनुच्छेद ३४अ समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद, या विधेयकात नाही.

(शा.म.मु.) एचबी ८३५–२ (१०४०–७–२०२६)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र मुद्रांक (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ५६.—महाराष्ट्र मुद्रांक (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६.

(महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५७ यातील उतारे)

(सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०)

१. ते **७६** *** *** ***

अनुसूची एक

संलेखांवरील मुद्रांक शुल्क

(कलम ३ पहा)

संलेखाचे वर्ण (१)	उचित मुद्रांक शुल्क (२)
(१) ते **(३६)** *** ***	***
(३६अ) *** ***	***
३७. शेअर्स वाटपपत्र.— कोणत्याही कंपनीतील किंवा नियोजित कंपनीतील शेअर्सच्या वाटपासंबंधातील, अथवा कोणत्याही कंपनीने किंवा नियोजित कंपनीने उभारावयाच्या कोणत्याही कर्जाच्या संबंधातील शेअर्स वाटपपत्र.	एक रुपये
प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज (अनुच्छेद १७) देखील पहा.	
हमीपत्र.—करार (अनुच्छेद ५) पहा.	
(३८) ते **(६३)** *** ***	***

अनुसूची दोन. *** *** ***

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६.]

[महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]

[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,
महसूल मंत्री.**]**

जितेंद्र भोळे,
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.